स्पे.मु.क. ४०७/२०१५

वेणू गोपाळ नायर ... वादी

वि.

निलीमा दिलीप मनवे, वगैरे ... प्रतिवादी

## :: निशाणी ५० वर आदेश ::

प्रस्तुत अर्ज प्रतिवादींच्या बाजूने सदर प्रकरणात युक्तीवाद करण्याकरीता दोन महिन्यांची मुदत मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जात असे नमूद करण्यात आले आहे की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींच्या बाजूने देण्यात आलेले दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ रुल ११ अन्वये अर्ज हा या न्यायालयात फेटाळण्यात आलेला आहे आणि सदर आदेशा विरुध्द मा. उच्च न्यायालयात दाद मागण्यात आलेली आहे. मा.उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात दोन महिन्यांची मुदत मिळण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. अर्जाच्या पाठीमागे वादीच्या बाजूने लेखी म्हणणे दाखल करण्यात आले व अर्जास हरकत घेण्यात आली. त्यात असे नमुद करण्यात आले की, प्रस्तुत अर्ज हा प्रकरणात विलंब होण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे. सदर अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण देण्यात आलेले नाही. मा.उच्च न्यायालयाने प्रस्तुत प्रकरण हे स्थगित केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्याने केलेली आहे.

४. सदर अर्जाचे व लेखी म्हणण्याचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचे विदयमान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज हा दि.१८/०२/२०१६ रोजी

देण्यात आलेला आहे व तद्नंतर प्रस्तुत प्रकरण आजपर्यंत तीन तारखेस तहकूब करण्यात आलेले आहे. सबब ही बाब विचारात घेता दि.१८/०२/२०१६ रोजी प्रकरण तहकूब करण्याची व पुढील तारीख मिळण्याची विनंती ही निष्फळ झालेली आहे. प्रस्तुत प्रकरण हे नि.५ वर दाखल करण्यात आले. तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर युक्तीवाद/सुनावणी करीता ठेवण्यात आलेले आहे. तरी ही परिस्थिती विचारात घेता अर्जदार/प्रतिवादी यांची प्रस्तुत प्रकरणात दोन महिन्यांकरीता प्रकरण तहकूब करण्याची विनंती मान्य करण्यासारखी नाही. सबब वरील कारणास्तव प्रस्तुत अर्ज हा अंशत: मंजूर करुन दफ्तरी दाखल करण्यात येतो.

पनवेल (राजेश क. खोमणे)
दिनांक - १५/०३/२०१६ २रे सह दिवाणी न्यायाधिश, व.स्तर, पनवेल